लोकमत

संडे अँकर । तंत्रज्ञान अधिविभागातील कार्यशाळा : गांधी ग्लोबल सौरयात्रेअंतर्गत २५० जणांना प्रशिक्षण;

# विद्यापीठात सौरदूतांनी बनविले सोलर स्टडी लॅंप

## ८० देशांतील ४ हजार केंद्रांमध्ये आयोजन

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जगभरातील विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती करण्यासाठी आयआयटी, मुंबईने गांधीजयंतीच्या निमित्ताने केवळ देशातच नव्हे, तर जगभरातील ८० देशांतील सुमारे चार हजार केंद्रांमध्ये ग्लोबल सौरयात्रेचे आयोजन केले. त्यामध्ये विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचा समावेश करण्यात आला ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केलेल्या या कार्यशाळेत बी. टेक. अभ्यासक्रमाच्या सुमारे २५० विद्यार्थ्यांना सोलर (सौरऊर्जा) स्टडी लॅम्प बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. टेक्विप उपक्रमांतर्गत त्यांना त्यासाठी आवश्यक साधनांची उपलब्धता करून देण्यात आली. सौरऊर्जेच्या प्रसारासाठी काम करण्याची आणि पर्यावरणाप्रती अहिंसा धर्म बाळगण्याची त्यांना यावेळी शपथ देण्यात आली.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयआयटी, मुंबई यांच्या सहकार्याने महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंतीच्या निमित्ताने 'गांधी ग्लोबल सौरयात्रा' उपक्रमांतर्गत विद्यार्थी सौरदूत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित सौरदूत कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सोलर स्टडी लॅम्प तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.


तिच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, स्वच्छ ऊर्जा आणि ऊर्जेच्या संदर्भात स्वयंपूर्णता हा जगातील प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. त्यासाठी युवकांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करून गांधीजयंतीच्या निमित्ताने पर्यावरणाप्रती अहिंसा व प्रेम प्रदर्शित करण्याची गरज आहे.

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेचा जनसामान्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी कसा वापर करता येईल, यादृष्टीने कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले.

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी म्हणाले, गांधी ग्लोबल सौरयात्रेतून जगभरात सौरऊर्जेबाबत जागृती, अपारंपरिक ऊर्जा वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. याद्वारे अत्यल्प खर्चात, विश्वासार्ह आणि टिकाऊ सौर उपकरणांची निर्मिती शक्य आहे. या कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे उपस्थित होते. प्रवीण प्रभू यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

# 'फिल्म फेस्टिव्हल विचारमंथनची चळवळ'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. चंद्रकांत लंगरे

'सिनेमाच्या माध्यमाला कुठल्याही सीमारेषा नाहीत. भाषा, प्रांतापलीकडील लोकांना एकत्र जोडणारी आणि त्यांच्या समस्यांचे वेध घेणारे हे एक प्रभावी माध्यम आहे. फिल्म फेस्टिव्हलही कलाविषयक अभिरुची उंचावणारी व विचारमंथनाची चळवळ ठरावी,' असे मत सिने अभ्यासक व शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

विंटेज फिल्म फाउंडेशनतर्फे दुसऱ्या विंटेज इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलला शनिवारी प्रारंभ झाला. या दोन दिवसीय महोत्सवात जगभरातील शॉर्ट फिल्मचा समावेश आहे. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी लंगरे बोलत होते. शाहू स्मारक भवन येथे महोत्सव सुरू आहे. महोत्सवात डच, फ्रेंच, जर्मनी, पोर्तुगीजसह विविध भाषांतील शॉर्टफिल्म आहेत.

प्रा. लंगरे म्हणाले, 'कोल्हापूरला सिनेमानिर्मितीचा मोठी परंपरा लाभली आहे. या कलानगरीत आंतरराष्ट्रीय धर्तीवरील शॉर्ट फिल्म महोत्सव होत आहे. त्याद्वारे सिनेमा चळवळीला चालना मिळणार आहे. प्रत्येक कलाकृतीमध्ये एक वेगळा आशय असतो. लघुपट असो वा सिनेमा, त्यामध्ये मानवी भावभावनांचे प्रतिबिंब उमटलेले असते. लोकांच्या समस्यांचा वेध घेतलेला असतो. लोकांच्या समस्या सारख्या असतात. सिनेमातून त्या परिणामकारकपणे लोकांपर्यंत पोहोचविल्या जातात. महोत्सवामुळे वेगवेगळ्या देशांतील कलाकृतींचा सखोल अभ्यास, सखोल चिंतन झाले पाहिजे.'

याप्रसंगी सिने अभ्यासक व परीक्षक अनमोल कोठाडिया यांनी मनोगत व्यक्त केले. उद्घाटनानंतर 'इराणी' भाषेतील 'नेटिव्ह' ही शेतकऱ्यांच्या 'जलिल अँड खलिल' हा दोन भावांवर आधारित शॉर्टफिल्म दाखविली. दरम्यान, फाउंडेशनचे प्रमुख सचिन भोईराज यांनी प्रास्ताविक केले. चेतन पडोळे यांनी स्वागत केले. सायली कुलकर्णी यांनी आभार मानले.

## विंटेज इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलचे उद्घाटन

### कोल्हापुरातील कलाकृतींचा समावेश

कोल्हापुरातील कलाकारांनी बनविलेल्या 'धागा', 'दृष्टिकोन' आणि 'घुसमट' या शॉर्टफिल्मचा समावेश आहे. महोत्सवाच्या माध्यमातून कोल्हापुरातील कलाकारांच्या कलानिर्मितीचा आस्वाद लुटता येणार आहे. रविवारी 'धागा' आणि 'दृष्टिकोन' दाखविण्यात येणार आहेत. तसेच 'नाऊ युवर होम' ही ॲनिमेशन कलाकृती महोत्सवात आहे. शनिवारी घुसमट प्रदर्शित झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2019
पुढारी



कोल्हापूर : पुढारी रिलीफ फाऊंडेशनसाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्याकडे सुपूर्द करताना शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे शिष्टमंडळ. (छाया : तय्यब अली)

# विद्यापीठ सेवक संघाच्या वतीने पुढारी रिलीफ फाऊंडेशनला निधी

## दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्याकडे धनादेश सुपूर्द

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पुढारी रिलीफ फाऊंडेशनसाठी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या वतीने ५१ हजार रुपये मदतीचा धनादेश संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्याकडे शनिवारी सुपूर्द केला.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यात आलेल्या महापुरामुळे हाहाकार माजला. पुरामुळे नागरिकांचे आतोनात नुकसान झाले. आर्थिक नुकसानीबरोबर घरादारांची पडझड झाल्याने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. दै. 'पुढारी'ने यात पुढाकार घेऊन पूरग्रस्त सहाय्य केले आहे, हे अभिमानास्पद आहे.

यावेळी उपाध्यक्ष संभाजी कांबळे, सरचिटणीस राम तुपे, श्रीकांत शिंदे, मिलिंद भोसले, रमेश पोवार, अजय आयरेकर, अतुल एतावडेकर, सदानंद माने, अनिल साळोखे, अमोल घुणके, महेश सणगर, राजेंद्र चव्हाण, विजय पाटील, संदीप हेगडे, जर्नादन सुरकुले, डॉ. राजेंद्र खामकर, राजेश चव्हाण आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2019
तरुण भारत


# चित्रपट विचारांचे बलस्थान

## डॉ. चंद्रकांत लंगरे : विंटेज इंटरनॅशनल फिल्म फेस्टीव्हलचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सुरवातीपासूनच कोल्हापुरात चित्रपट निर्मितीची चळवळ रूजली आहे. त्यामुळे कोल्हापूर हे चित्रपट निर्मितीचे आरंभ बिंदू मानले जाते. चित्रपट हे विचाराचे बलस्थान आहे, पण चित्रपट पाहणारा संवेदनशील व संशोधन वृत्तीचा असला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विभागाचे डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

विंटेज फिल्म फाउंडेशनद्वारा आयोजित विंटेज इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शाहू स्मारक भवनमध्ये सुरू असलेल्या या फिल्म फेस्टिव्हलमध्ये पहिल्याच दिवशी ३६ चित्रपटांचे सादरीकरण करण्यात आले.



कोल्हापूर : विंटेज इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. चंद्रकांत लंगरे. सोबत डॉ. अनमोल कोठाडिया, विंटेज फिल्म फाऊंडेशनचे चेअरमन सचिन भोईराजे, व्हाईस चेअरमन चेतन पडोळे.

महोत्सवाची सुरुवात 'नेटिव्ह' या माहितीपटाने करण्यात आली. इराणमधील मीठ शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर आधारीत १५ मिनिटांचा 'नेटिव्ह' माहितीपटाने उपस्थितांचे मन हेलावून टाकले.

इराणमधील मिठागाराप्रमाणेच भारतातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाची आठवण करून दिली. तयार झालेले मीठ बाजारात विक्री केल्यानंतर वाहतुकीचा खर्चही निघत नाही, अशा शेतकऱ्यांच्या वेदना या चित्रपटातून अधोरेखित केल्या आहेत.

या फेस्टीव्हलमध्ये भारतासह जपान, यू .के., रशिया, कॅनडा, अमेरिका, मकाऊ, इराण, फ्रांस, सौदी अरेबिया, नेदरलँड, स्वित्झर्लंड, स्पेन, चीन, हंगेरी, बांगलादेश, दक्षिण कोरिया, स्वीडन, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आदी देशातील उत्कृष्ठ लघुपटांचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. यावेळी चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, विंटेज फिल्म फाऊंडेशनचे चेअरमन सचिन भोईराजे, व्हाईस चेअरमन चेतन पडोळे यांच्यासह विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.